**<u>पुढील उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. अभिजीत पाटील यांचेमार्फत</u>** :

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा कर्जदार किंवा जामीनदार नाही. साक्षीदार सांगतो की, तो संमती देणारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ हा संमतीदार असल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा कोर्टाच्या अभिलेखावर दाखल नाही. साक्षीदार अभिलेख पाहून सांगतो की, तसा पुरावा अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, संमतीपत्र व पत्र या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ व २ विरुद्ध समरी खटला क्र. ७२०/२०१८ व ७२२/२०१८ असे दोन प्रकरण दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरची दोन्ही प्रकरणे ही सोने तारण घेतल्यासंदर्भात होती. हे म्हणणे खरे आहे की, तिन्ही खटल्यासांठी एकच ठराव केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, समरी खटला क्र. ७२०/२०१८ व ७२२/२०१८ मधून आरोपींना निर्दोष मुक्त केलेले आहे. साक्षीदार सांगतो की, अपील चालू आहे.

३. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१४ साली आरोपी क्र. १ ने सोने तारण कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, मुदत संपल्यानंतर नोटीस पाठवावी लागते. मी मुदत संपल्यानंतर आरोपीला नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला पाठविलेली नोटीस अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोन्याचा लिलाव केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी लिलावाची प्रक्रिया केलेली नाही. आरोपीविरुद्ध कर्ज थकीत झाल्याबाबत कलम १०१ ची कार्यवाही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ ते २०१८ पर्यंत आरोपींविरुद्ध कुठलीही कार्यवाही केली नव्हती. सन २०१४ ते २०१८ पर्यंत कार्यवाही केल्याबाबत कादगदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जे सोने

:: ::

आमच्याकडे तारण होते ते विकण्याचे अधिकार आम्हाला होते. हे म्हणणे खरे आहे की, अधिकाराचा वापर करुन सोन्याचा लिलाव केला असता तर कर्जाची रक्कम वसूल झाली असती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अर्ज दिल्यामुळे मुदत दिली होती.

४. सन २०१४ मध्ये आरोपीने विनंती केल्याबाबतचा अर्ज मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कुठलेही कायदेशीर देणे लागत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कर्जाची रक्कम दामदुपटीने वसूल करता यावी म्हणून आरोपींविरुद्ध कोणतीच कार्यवाही केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळेच तारण ठेवलेले सोने विक्री केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडून रु. १,८८,२६१/— वसूल करणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पाठविलेली नोटीस आरोपीला प्राप्त झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला केस चालविण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशीर वसूली करुन मागत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिलेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०२/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्रीमती हातणकर यांचेमार्फत</u>** :

०६. मी आरोपी क्र. १ च्या कर्जाचा खातेउतारा दाखल केलेला आहे. सदरचा खातेउतारा मी तयार केलेला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात येते. आरोपी क्र. १ ने कर्ज मागणी अर्ज दिला होता. तो अर्ज मी दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ६६** देण्यात येते. त्यासोबत मी तीन वचन चिठ्ठ्या दाखल केलेल्या आहेत. तीन वचन चिठ्ठ्यांस अनुक्रमे **निशाणी क्र. ६७** ते **६९** देण्यात येते. आरोपीने फिर्यादी बॅकेला दिलेले पत्र दाखल केलेले आहे. त्यावर आरोपी क्र. १ ची सही आहे. समक्ष म्हणून तिचे पती व सासरे यांची सही आहे. ते पत्र बॅकेला दिलेले आहे. त्यास **निशाणी क्र. ७०** देण्यात येते. आरोपीच्या वकीलांनी सदर पत्रास निशाणी क्रमांक देण्यास हरकत घेतली. पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे पत्र बॅकेच्या नावाने दिलेले आहे त्यामुळे हरकत फेटाळण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. अभिजीत पाटील यांचेमार्फत</u>** :

०७. मी २९ वर्षापासून पतसंस्थेत कार्यरत आहे. मला साक्ष देण्यासाठी साक्षीसमन्स आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी यापूर्वी दोन केसेसमध्ये साक्ष झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला साक्ष कशी द्यायची याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व्यवस्थापक या पदावर कार्यरत असल्यामुळे मला कर्ज प्रकरणासंदर्भात, वसुलीच्या नियमांबाबत व त्याच्या वसुलीसंदर्भात माहिती आहे.

:: ::

०८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ने सोने तारण कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे कर्ज हे सहा महिन्यांच्या मुदतीकरीता घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा कर्जदार किंवा जामीनदार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा या कर्ज प्रकरणात सभासद देखील नाही. हे म्हणणे खरे आहे की, जामीनदार नसलेल्या प्रकरणात कर्ज भरण्याची जबाबदारी कर्जदाराची असते.

०९. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाची मुदत दि. १५/०९/२०१४ रोजी संपली. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाची मुदत संपल्यानंतर वसुलीची नोटीस पाठवावी लागते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/०९/२०१४ ते सन २०१८ पर्यंत मी आरोपींना कोणतीही नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज थकीत झाल्यानंतर सहकार न्यायालयात कर्ज वसुलीसाठी जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, मुदत संपल्यानंतर आम्ही अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने सोन्याचे हार, बांगडी, अंगठी तारण ठेवून कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या सर्व वस्तू आजही आमच्या ताब्यात आहेत.

१०. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेले दागिने मुदत संपल्यानंतर विकण्याचे अधिकार बॅकेला आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पतसंस्थेने दागिन्यांचा जाहीर लिलाव केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने ठेवलेल्या दागिन्यांची लिलावाने विक्री केली असती तर कर्जाची रक्कम वसुल झाली असती. साक्षीदार सांगतो की, आरोपीने विनंती केली होती. आरोपीने लेखी विनंती आमच्या बॅकेकडे केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बॅकेचा सर्व व्यवहार कागदोपत्री चालतो.

११. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१४ ते २०१८ पर्यंत वसुलीसाठी कोर्टात कायदेशीर कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ विरुद्ध समरी केस नं. ७२०/२०१८ व ७२२/२०१८ या केसेस दाखल होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या केसेस देखील सोने कर्ज तारण प्रकरणांविषयी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही प्रकरणांतील कर्ज हे देखील सहा महिने मुदतीचे व सोने कर्ज तारण म्हणून घेण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही केसेसमधील सोन्याचा लिलाव केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही केसमधून आरोपी क्र. १ व २ यांना सन २०२४ मध्ये निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

१२. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाची रक्कम रुपये ९०,०००/— होती. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज रक्कम मुद्दल रक्कमेच्या दुपटीने वसुल करुन मागता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाची रक्कम आता मुद्दल रक्कमेच्या दुप्पट झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज वसुलीबाबत, वसुली खर्च, व्याज, दंड व्याज यांच्या आकारणीबाबत नियमावली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला अतिरिक्त व्याजदर आकारलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वचन चिठ्ठीची मुदत तीन वर्षे असते. हे म्हणणे खरे आहे की, वचन चिठ्ठी निशाणी ६९ करीता लागणारा बॉन्ड आरोपीने आणलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा बॉन्ड पतसंस्थेने दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वचन चिठ्ठी निशाणी क्र. ६९ वरील पहिल्या पानावर आरोपीची सहज सही झाली असती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६९ च्या पहिल्या पानावर आरोपीची सही घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वचन चिठ्ठी निशाणी क्र. ६९ आरोपीने लिहून दिलेली नाही.

१३. निशाणी क्र. ७० हा अर्ज किंवा संमतीपत्र नाही. हे म्हणणे खरे आहे

की, निशाणी क्र. ७० वरील हस्ताक्षर आरोपीचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, संचालक मंडळाचा कर्ज वसुली संदर्भात ठराव होतो. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्थेकडे आवक जावक रजिस्टर असते. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज मागणी अर्ज, वचन चिठ्ठी, कर्जरोखा यांवरील सह्या वेगवेगळ्या आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सह्या एकसारख्या आहेत.

१४. हे म्हणणे खरे आहे की, कर्जरोख्यावर पतसंस्थेचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की, खातेउतारा निशाणी क्र. ६५ ची प्रिंट मी काढलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्याने प्रिंट काढली त्याला प्रिंट काढण्याचे ज्ञान असल्याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरमध्ये माहिती आपणच भरतो. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरमध्ये छेडछाड न केल्याबाबत दाखला दिलेला नाही. संगणक व प्रिंटर व्यवस्थित असल्याबाबतचे कागदपत्र दाखल केलेले नाही. ज्याने डाटा अपलोड केला त्याला संगणक वापरण्याचे ज्ञान असल्याबाबतचे कागदपत्र दाखल केलेले नाही. खातेउताऱ्याची प्रिंट काढली त्यांची खातेउताऱ्यावर सही नाही.

१५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी पतसंस्थेला कोणतेही कायदेशीर देणे लागत नाहीत. अकाऊंट विभाग निलेश राऊत सांभाळतात. प्रिंटींग विभाग अश्विनी शैलेश नाईक सांभाळतात. संगणकावरील बॅंकेचे व्यवहार निलेश राऊत व अश्विनी नाईक सांभाळतात. हे म्हणणे खरे आहे की, सभासदांचे अनेक प्रकार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरचे मेंटेनन्स करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरचे हेड ऑफीस पुणे येथे आहे. मेंटेनन्सचे ॲग्रीमेंट एक वर्षाने करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरचे एक पासवर्ड कंपनीकडे व एक आमच्याकडे असते. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअर सुरक्षित असल्याबाबतचा कोणताही

कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कर्जाची रक्कम दामदुपटीने मागू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कर्जाची रक्कम फुगवण्यासाठी दागिन्यांचा लिलाव केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रुपये १,८८,२६१/— देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला १३८ प्रमाणे नोटीस प्राप्त नाही. हे म्हणणे खरे आहे की, तिन्ही केसेससाठी एकच ठराव केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी केसमध्ये नमूद रक्कम बॅकेला देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बेकायदेशीर रक्कम टाकून धनादेश अनादरीत केला. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात खोटा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०४/११/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. **७२१/२०१८**
निशाणी क्र. **८१/क**

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **शैलेंद्र भिमराव वासनीक** |
| वय सुमारे | : | ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मु. चौल, रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी फिर्यादीतर्फे वकील श्री. योगेश पार्टे यांचेमार्फत</u>** :

०१. चौल या शाखेत मी दि. २४/१२/२०२५ पासून शाखा प्रबंधक म्हणून कार्यरत आहे. यापूर्वी मी नागपूर येथे कार्यरत होतो. विजयकुमार गोविंद घरत यांचे चौल शाखेत बॅंक खाते आहे. बॅंक खाते उतारा आज मी दाखल केलेला आहे. आता मला दाखवण्यात आलेला खाते उतारा तोच आहे. त्यावर माझी सही व बॅंकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बराबर आहे. तो दि. ३०/०७/२०१८ ते ३१/०८/२०१८ या कालावधीचा खाते उतारा आहे. त्यास **निशाणी क्र. ८२** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अतुल मयेकर यांचेमार्फत</u>** :

०२. मी २५ वर्षापासून बॅंकींग क्षेत्रात काम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्था व आरोपी यांच्यातील व्यवहाराची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, चौल येथील शाखा मोठी आहे. आमच्या शाखेमध्ये दोन कर्मचारी कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही बॅंकेचे व्यवहार मेंटेंन करण्यासाठी सॉफ्टवेअरचा वापर करतो. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरचे नेहमी मेंटेनन्स करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, सॉफ्टवेअरचे मेंटेनन्स केले नाही तर एरर येवू शकते.

०३.	हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये सॉफ्टवेअरचे मेंटेनन्स केले की नाही हे मला माहीत नाही. सॉफ्टवेअर मेंटेनन्ससाठी पासवर्ड नसते. हे म्हणणे खरे आहे की, संगणकावर बॅंकेचे व्यवहार मॅन्युअली अपलोड केले जातात. हे म्हणणे खरे आहे की, २०१८ साली संगणकावर एन्ट्री कोण करत होते याची मला व्यक्तीश: माहिती नाही.

०४.	खाते उताऱ्याची प्रिंट मी स्वत: काढली आहे. आमचे सिस्टम ॲटोमॅटीकली अपडेट होत असतात. बॅंकेत पैसे जमा केल्यावर ती एन्ट्री आमच्या बॅंकेत केली जाते. एन्ट्री आमचे स्टाफ किर्तीमाला हवालदार ह्या करतात. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बॅंकेची संगणक प्रणाली सुस्थितीत असल्याबाबत मी कागदपत्र दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बॅंकेचे संगणक सुस्थितीत असल्याबाबत मी दाखला दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज खातेउताऱ्याव्यतिरिक्त इतर कागदपत्र दाखल केलेले नाहीत. दिपाली विजयकुमार घरत ही नॉमीनी होती.

०५.	हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या खातेउताऱ्याच्या आधारे चुकीची साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सन २०१८ च्या व्यवहाराची माहिती नसल्याने मी चुकीची साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकीचा खातेउतारा आज रोजी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.　　　　　　　　　　　　**( एम्. बी. अत्तार )**

दिनांक : **०३/०२/२०२६**.　　　　　　मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.